Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १०] गुरुवार ते बुधवार, मार्च १२-१८, २०२६/ फाल्गुन २१-२७, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ-अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७५.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक नपप्र-कार्या-२-कावि-१७२३-२०२६. —

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्यौगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ ब-५चे तरतुदी अन्वये, मी, विकास मीना, जिल्हाधिकारी, यवतमाळ मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन **नगरपंचायत महागाव,** जिल्हा यवतमाळ येथील सार्वत्रिक निवडणूक २०२१-२०२२ मध्ये निवडून आलेले एकूण १७ सदस्यांमधून दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ च्या विशेषसभेद्वारे नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या श्रीमती, सुनंदा दिलीप सुरोशे, नगराध्यक्षा, नगरपंचायत, महागाव जिल्हा यवतमाळ यांचेविरुद्ध दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजीचे विशेष सभेत आवश्यक २/३ पेक्षा अधिक बहुमताने अविश्वास ठराव पारित झालेला असल्यामुळे त्यांची नगराध्यक्ष म्हणून झालेली निवड अविश्वास ठराव पारित झालेल्या दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने रद्दबातल झालेली आहे, असे घोषित करीत आहे.

यवतमाळ :
दिनांक २० फेब्रुवारी, २०२६.

**विकास मीना,**
जिल्हाधिकारी यवतमाळ.

भाग १-अ ( अ. वि. पु. ) म. शा. रा., अ. क्र. ७६.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल / बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण**

**सूचना**

क्रमांक २०५४ नपंमो-बां. वि. -२०२५-२६. —

ज्याअर्थी, मोताळा नगर पंचायतीने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, चे कलम २६ (१) नुसार प्रारुप विकास योजना, दिनांक १६ जून, २०२५ चे सूचने व्दारे नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात अमरावती विभागीय पुरवणी भाग एक-अ मध्ये दिनांक २६ जून, २०२५ ते ०२ जूलै, २०२५ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८ (४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजी सादर केला;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने, नव्याने बदल सुचवून, उक्त योजनेत फेरबदल / बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. ०३, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पारित केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) खालील तरतूदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल / बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदलांची / बदलांची सुची परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट – अ**

**अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदल / बदलांची सूची**

| क्रमांक | फेरबदल / बदलांचा तपशील |
|---|---|
| (१) | (२) |
| **एम १** | मौजे मोताळा गट नं. २६ भाग, ३९, ४०, ७४ भाग, ७९, ८०, ८१, ८२ भाग, ८४ व ४८८ भाग मधील क्षेत्र नाविकास विभाग मधून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| **एम २** | मौजे मोताळा गट न. १८ भाग मधील क्षेत्र नाविकास विभाग मधून वगळून वाणिज्य विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| **एम ३** | मौजे मोताळा गट नं.७३ भाग, ७४ भाग, ७६भाग, ७७भाग, १०५ व १०६ मधील क्षेत्र नाविकास विभाग मधून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| **एम ४** | आरक्षण क्रमांक ८ ( दवाखाना व प्रसूतीगृह ) UHC, मौजे मोताळा गट नंबर १५९ भाग मधील आरक्षणाचे नामाभिदान बगीचा व बहुउपयोगी सभागृह करण्यात आले. |

सदर फेरबदल / बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला असून, न.पं. नोटीस बोर्ड वर सुध्दा उपलब्ध आहे.

( १ ) मुख्याधिकारी, नगर पंचायत, मोताळा.

( २ ) सहाय्यक संचालक, नगर रचना शाखा, बुलढाणा.

**गणेश पांडे,**
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, मोताळा.

मोताळा :
दिनांक २० फेब्रुवारी, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७७.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Publication of list of Modifications/Changes in Draft Development Plan of Motala u/s 28(*4*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No. NPM-2154-Conts. D.-2025-26. —

Whereas, Motala Nagar Panchayat, being Planning Authority, has published the Draft Development Plan of Motala u/s 26(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* notice dated 16 June, 2025 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazzette of Amravti Division, Supplement Part 01 A, dated 26 June, 2025 to 02 July, 2025,

And whereas, after considering the suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constitued u/s 28(*4*) of the said Act, has submitted its report to the said Planning Authority on 03 November, 2025,

And whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Committee, suggested changes in it and passed Resolution No. 03, dated 31 December, 2025 to make modifications/changes to the said Plan and to submit the said Plan for sanction to the Government u/s 30 of the said Act,

And whereas, it is necessary to publish the said modifications/changes made in the said Plan for inspection of the public as per Section 28(*4*) of the said Act;

Now, therefore, the list of modifications/changes made u/s 28(*4*) of the Act, by the said Planning Authority is hereby published as Appendix-A as per the provisions of said Act for information of the public.

APPENDIX-A

*List of modifications/changes made u/s 28(4) of the Act.*

| No. | Details of modifications/Changes |
|---|---|
| (1) | (2) |
| **M 1** | Mz. Motala, land under Gut No.26 part, 39, 40, 74part, 79,80,81,82 part, 84 and 488 part proposed to be deleted from Agricultural zone and land there under proposed to be included in Residential zone. |
| **M 2** | Mz. Motala, land under Gut No.18 part is proposed to be deleted from Agricultural zone and land there under proposed to be included in Commercial zone. |
| **M 3** | Mz. Motala, land under Gut No.73 part, 74 part, 76 part, 77 part, 105 and 106 proposed to be deleted from Agricultural zone and land there under proposed to be included in Residential zone. |
| **M 4** | Reservation No.8 Dispensary & Maternity Home in Gut no. 159 part of mouze Motala is redesignated as Garden and Multi-purpose hall. |

The said Draft Development Plan showing the modifications/changes is kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during office hours for a period of 30 days and is also available on Notice Board.

(1) The Chief Officer, Motala Nagar Panchayat, Distt. Buldhana.

(2) Assistant Director, Town Planning/Town Planner, Buldhana Branch, Buldhana.

GANESH PANDE,
Chief Officer,
Nagar Panchayat, Motala.

Motala :
Dated the 20th February, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.